स्थापना: १९८० रजि.नं.: केपीआर/जी.एन.एल./१३८

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर

१४५८ बी वॉर्ड, जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६०१२

# Kolhapur District Urban Banks Coop. Association Ltd., Kolhapur

1458 B ward, G.N. Chambers, Kolekar Tikati, Mangalwar Peth, Kolhapur 416012

☎ (0231) 2627307, ✉ kopbankasso@gmail.com, kopbankasso.com

**जनता सहकारी बँक लि; सातारा** या बँकेस पदवीधर उमेदवारांकडून ६० लिपीक पदांकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती भरती प्रक्रिया व मार्गदर्शन तसेच पदाकरिता आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता तसेच अन्य तपशील **Tsseco.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**लिपीक ६० पदांसाठी भरतीबाबत आवश्यक तपशील -**

| अ.क्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | उमेदवाराची शैक्षणिक पात्रता | ❖ **आवश्यक**<br>१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>२) MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>३) मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांचे ज्ञान आवश्यक.<br>❖ **प्राधान्य**<br>१) कोणत्याही सहकारी बँकींग क्षेत्रात किंवा इतर वित्तीय संस्थेत लिपिक पदाचा अनुभव असणा- यांस प्राधान्य.<br>२) JAIIB/CAIIB/GDC&Aउत्तीर्ण तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची (ICM, IIBF, VAMNICOM इ) बँकींग / सहकार / कायदेविषयक पदविका प्राप्त केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | उमेदवाराची वयोमर्यादा | उमेदवाराची वयोमर्यादा: २२ ते ३५ वर्षे |
| ३ | ऑनलाईन परीक्षा शुल्क | **११८०/- (जीएसटीसह) + Applicable Bank Charges**<br>परीक्षा शुल्क (जीएसटीसह) व Applicable Bank Transaction charges हे नापरतावा (विनापरतीची) राहतील याची नोंद घ्यावी. |
| ४ | ऑनलाईन परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम | General Knowledge, Aptitude, Reasoning, Mathematics, Marathi and English Grammar, Computer Literacy and Banking. Medium of Examination: Marathi & English (English Language questions in English) |
| ५ | परीक्षेचे स्वरूप व निवड पद्धती | १) परीक्षेचा कालावधी १२० मिनिटांचा (दोन तास) राहील.<br>२) परीक्षा बहुपर्यायी स्वरुपाची असेल.<br>३) परीक्षा १०० गुणांची राहील.<br>४) ऑनलाईन परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांची तोंडी मुलाखत बँकेमार्फत आयोजित केली जाईल. |
| ६ | ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दिनांक २०/०२/२०२६ सकाळी १०.०० वाजलेपासून ते<br>दिनांक ०२/०३/२०२६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत |
| ७ | परीक्षा पद्धती | ऑनलाईन |
| ८ | सुरवातीस देय पगार | प्रशिक्षण कालावधीतील देय पगार रुपये ६५००/- अधिक PF, Gratuity<br>कायम झालेनंतर देय पगार रुपये ११०००/- अधिक PF, Gratuity |
| ९ | लिपिक पदाच्या भरतीबाबत अटी व शर्ती अथवा इतर कोणतेही बदल करण्याचे अधिकार बँक व्यवस्थापन यांना राहतील याची नोंद घ्यावी. | |

तरी इच्छुक उमेदवारांनी **Tsseco.in** या वेबसाईटवर विहित वेळेत online परीक्षा शुल्क भरून online अर्ज सादर करावेत. उपरोक्त पदासाठी उपरोक्त वेबसाईटद्वारे online पध्दतीनेच अर्ज करावयाचे आहेत. अन्य कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जाचा आणि फी चा विचार केला जाणार नाही याचीही नोंद घ्यावी.

❖ **Online पध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया.**

१) अर्ज करण्याची पध्दत - Online अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना **Tsseco.in** संकेत स्थळावर उपलब्ध आहे. उमेदवार त्याचा अर्ज internet सुविधा असलेल्या ठिकाणी भरु शकेल.

२) परिक्षा शुल्क फक्त ऑनलाइन पेमेंट माध्यमातूनच भरावे लागेल. परिक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे न भरल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल. ऑनलाइन पेमेंट अपडेट होण्याकरिता २४ ते ४८ तास लागू शकतात, उमेदवारांचे पेमेंट अपडेट झाल्यानंतर त्यांनी आपल्या अर्जाची प्रत आपल्याकडे सांभाळून ठेवावी.

३) अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने खालील प्रमाणे नजीकच्या काळातील छायाचित्र व स्वाक्षरी ईमेज soft कॉपी स्वत:कडे ठेवावी.

| तपशील | Size limit | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलीकडील पासपोर्ट छायाचीत्र | JPEG FORMAT मधील २० KB पर्यंत | लांबी X रुदी प्रमाण (PROPORTION) ३.५ cm * ४.५cm असावे छायाचीत्र समोर चेहऱ्याचे असावे. छायाचीत्राचा ७५% भाग चेहरा असावा. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील २० KB पर्यंत | कोऱ्या पांढऱ्या कागदावर गडद जाड पॉईंट पेनने स्वाक्षरी करावी. साईज २.५cm*१.५cm असावे. |

४) उमेदवाराचे फोटो व सही ऑनलाईन अर्ज भरतांना upload करणे आवश्यक आहे. अर्जातील सर्व आवश्यक माहिती भरणे बंधनकारक आहे.

५) अर्जदाराने upload केलेले image सुस्पष्ट नसल्यास त्यास अपात्र ठरविले जाऊ शकते याची नोंद घ्यावी.

६) सदर पेज वरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर submit यावर click करावे.

७) अर्जात भरलेली माहिती परिपुर्ण असल्यास येणा-या मेसेज बॉक्स मध्ये भरती प्रकियेतील पुढील बाबीची (उदा. अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेश पत्र काढणे. जन्म तारीख वगैरे) माहिती अचुक असल्याची खात्री करावी.

८) अर्जात भरलेली माहीती परिपुर्ण असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहिती दुरुस्त करून अचुक भरल्यानंतर save & continue या वर क्लीक करावे. त्यानंतर अर्जाचा ID ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याची अथवा विहीत केलेले परिक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख याबाबतची माहिती उमेदवारास दिसेल.

९) तयार झालेले Form Id भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने तो, उमेदवाराने सांभाळून जतन / नोंद / करुन ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवाराला बदलता येणार नाही.

१०) उमदेवाराने अर्जात नमुद केलेली सर्व माहीती व तपशील अचुक असुन कोणतेही माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढळल्यास अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे प्रतिज्ञा पत्र मान्य करुन submit my form यावर click करावे. त्यानंतर अर्ज सादर होईल.

११) त्यानंतरच्या page वर Form Id व Mobile No ही माहिती भरुन प्रिंट रिसीट यावर क्लीक करावे. त्यानंतर उमेदवाराच्या अर्जाची पोच पावती उपलब्ध होईल.

१२) E-mail प्राप्त झाल्यावर उमेदवार Form ची पोच पावती काढून घेऊ शकतो.

१३) अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत आक्षेप असल्यास **helpdesk26.kolhapur@gmail.com** या ई मेल वर अथवा **९९६५११००१४** या नंबर वरती कळवावे.

**१४) Online (ऑनलाईन) परिक्षा उमेदवाराचे कोणतेही कागदपत्र तपासणी न करता घेतली जाणार असल्याने नंतर कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास, केवळ Online (ऑनलाईन) परिक्षेस बसू दिल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.**

१५) अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१६) परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारास संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर पत्र पोस्टाने पाठवले जाणार नाही. परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र)

१७) सदरची परिक्षा ऑनलाईन पध्दतीने असलेने उमेदवारांनी संकेत स्थळावर प्रसिध्द होणा-या सुचनांची नोंद घेण्यासाठी वारंवार **Tsseco.in** या वेबसाईटला भेट देणे आवश्यक आहे. सदर परीक्षा कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर यांचे मार्फत **सातारा येथे आयोजित** केली जाणार आहे. परीक्षेचे स्थळ नियोजित तारखेपूर्वी उमेदवारांना कळविले जाईल.

१८) सदर कर्मचारी भरती ही अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांमधून बँकेच्या आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

१९) नोकरभरती विषयक सर्वाधिकार बँक व्यवस्थापनाकडे राखून ठेवत असून भरती प्रक्रिया संपूर्ण किंवा अंशतः रद्द करण्याचे अधिकार देखील बँक राखून ठेवत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सह. असोसिएशन लि; कोल्हापूर